


**उद्धव ठाकरे**

शिवसेना कार्याध्यक्ष


# शुभेच्छा

प्रति,

मा. राम नाईक

यांसी सस्नेह जय महाराष्ट्र!

महोदय,

आपण आपल्या वयाची पंचाहत्तरी पूर्ण केलीत. पंचाहत्तर वर्षांपैकी सुमारे ३० वर्षे महाराष्ट्राची विधानसभा व हिन्दुस्थानची लोकसभा आपल्या अभ्यासू व तडफदार वृत्तीने गाजविलीत. याची स्मृती नेहमीच महाराष्ट्राच्या विधानसभेत तसेच संसदेच्या इतिहासात अजरामर राहील. उपनगरी रेल्वे प्रवास सुखकर व्हावा, तसेच प्रवाशांना अनेक सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी आपण पाठपुरावा केलात, त्याची प्रचिती म्हणजे केन्द्रीय रेल्वे राज्यमंत्री झाल्यानंतर त्या सुख-सुविधा पुरविण्यासाठी चांगले प्रयत्न केलेत.

अमृतमहोत्सवी वर्ष साजरे करीत असताना ऐन तारुण्यात तरुणाने समाजसेवेचे व्रत अंगीकारावे असेच आपले सामाजिक कार्य सुरु आहे आणि या आपल्या कार्यामुळे उदयोन्मुख कार्यकर्त्याला निश्चितच स्फूर्ती मिळेल. एक नेता, एक सच्चा समाजसेवक, एक सुहृद, एक आप्त असे असंख्य पैलू असलेल्या व्यक्तिमत्त्वाचा सहवास आम्हाला लाभला व लाभत राहील.

अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त आपणाला मी व माझ्या कुटुंबीयांच्यातर्फे तसेच तमाम शिवसैनिकांच्यावतीने हार्दिक शुभेच्छा! आपणास सुख-समृद्धी, उदंड निरोगी आयुष्य लाभो, हीच आई जगदंबे चरणी प्रार्थना.

आपला नम्र,

(उद्धव ठाकरे)


शिवसेना भवन मार्ग, शिवाजी पार्क, दादर (प.) मुंबई - ४०० ०२८. दूरध्वनी : २४२२५२६७/२४३७११९९/२४३०९१२८ फॅक्स - २४२११७१७